Date of Publication
01 October 2021

# Vidyawarta™

## International Multilingual Research Journal

www. विद्यावार्ता.कॉम
YouTube Channel

*Vidyawarta is peer reviewed research journal. The review committee & editorial board formed/appointed by Harshwardhan Publication scrutinizes the received research papers and articles. Then the recommended papers and articles are published. The editor or publisher doesn't claim that this is UGC CARE approved journal or recommended by any university. We publish this journal for creating awareness and aptitude regarding educational research and literary criticism.*

*The Views expressed in the published articles,Research Papers etc. are their writers own. This Journal dose not take any libility regarding appoval/disapproval by any university, institute, academic body and others. The agreement of the Editor, Editorial Board or Publicaton is not necessary. Editors and publishers have the right to convert all texts published in Vidyavarta (e.g. CD / DVD / Video / Audio / Edited book / Abstract Etc. and other formats).*

***If any judicial matter occurs, the jurisdiction is limited up to Beed (Maharashtra) court only.***




IMPACT FACTOR 7.940 iijif



Govt. of India,
Trade Marks Registry
Regd. No. 2611690

http://www.printingarea.blogspot.com

प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे

संपादक मंडळ

प्रमुख संपादक

प्रा.डॉ.राजेंद्र ठाकरे

प्रा.डॉ.अतुल चौरे

सहाय्यक संपादक

प्रा. डॉ. नम्रता मेस्त्री

प्रा. डॉ. संदीप वाकडे

66) आंबेडकरवाद आणि नव्वदोत्तरी दलित कादंबरीचे स्वरूप
सुमित साळुंखे ||322

67) बुढाई : ग्रामीण शहरी सामाजिक वास्तव
प्रा. भाग्यश्री आर.पाटील, धुळे ||329

68) मराठीतील १९६० नंतरचे विविध वाङ्मयीन प्रवाह व सद्य:स्थिती मराठीतील ...
प्रा. डॉ. धनराज माने & कु. इंद्रकला पितमलाल बोपचे, नागपूर ||332

69) मराठीतील १९६० नंतरचे वाङ्मय प्रवाह: दलित साहित्यातील नामदेव ढसाळांचे ...
प्रा. डॉ. धनराज माने & किशोरकुमार रेखचंद चौधरी, नागपूर ||339

70) चरित्रलेखन एक ऐतिहासिक अवलोकन
डॉ. भालचंद्र गोविंदराव कुलकर्णी, वडवणी ||347

71) मराठीतील १९६० नंतरचा दलित साहित्य प्रवाह
सहा.प्रा.उषा सिताराम पाटील, नाशिक ||353

72) मराठीतील १९६० नंतरचे बालसाहित्य दिलीप प्रभावळकर यांचे योगदान
सौ.कामिनी कपिल थोरात, जि.पुणे ||357

73) मराठी आदिवासी कादंबऱ्यांतील अंधश्रद्धेचे चित्रण
सारिका शिवराम गांगुर्डे & डॉ. किरण नामदेव पिंगळे, जि. नाशिक ||361

74) मराठीतील १९६० नंतरच्या मुस्लिम लेखकांच्या मराठी कथालेखनातील समाजजीवन
रोहीत वाडिले ||366

75) साठोत्तरी मराठी कवितेतील बदलते प्रवाह
डॉ. संदीप रंगनाथ तापकीर, बारामती ||369

76) ग्रामीण साहित्याची वाटचाल १९६० ते .......
प्रो. डॉ. बाबासाहेब रावसाहेब शेंडगे, जिल्हा अहमदनगर ||373

77) साठोत्तरी ग्रामीण कविता आणि सद्य:स्थिती
डॉ. स्नेहल संजय मराठे, जि. नाशिक ||376

78) मराठीतील १९६० नंतरचे विविध वाङ्मयीन प्रवाह व सद्यस्थिती
जितेंद्र यादव गवई, औरंगाबाद ||380

www.vidyawarta.com/03 http://www.printingarea.blogspot.com

77

# सांठोत्तरी ग्रामीण कविता आणि सद्य:स्थिती

डॉ. स्नेहल संजय मराठे
सहाय्यक प्राध्यापक,
महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय,
मालेगाव कॅम्प, मालेगाव, जि. नाशिक

**प्रास्ताविक** : १९६० नंतर खऱ्या अर्थाने मराठी ग्रामीण साहित्याचा प्रवाह गतिमान झालेला दिसतो. कथा, कादंबरी, ललित लेखन यांच्यापेक्षा ग्रामीण कविता कमी प्रमाणात आणि काहीशी उशिरा अवतीर्ण झालेली आढळते. सुरुवातीला ग्रामीण जीवनाचे गद्य स्वरुपात केलेले वर्णन पद्य स्वरूपातही वाचकांसमोर यायला लागले. त्या साहित्यात वास्तवतेपेक्षा कल्पकतेला जास्त वाव आहे. केशवसुतांची 'एक खेडे', माधवानुज यांची 'दुष्काळ', चंद्रशेखर यांचे 'काय हो चमत्कार',भा.रा. तांबे यांची 'गुराखी' यासारख्या कवितांत, तसेच रविकिरण मंडळातील गिरीश, यशवंत, ग.ल.ठोकळ यांच्या 'सुगी' या कविता संग्रहातून ग्रामीण पार्श्वभूमी आणि जीवन यांचे वर्णन आलेले आहे.

ग्रामीण लोकजीवन आणि निसर्ग त्याच्या सर्व वैशिष्ट्यंसह आणि रंगरूपासह विविध निसर्ग प्रतिमांच्या रूपाने १९६० नंतरच्या ग्रामीण कवितेत अधिक प्रभावीपणे आणि आकर्षक स्वरूपात व्यक्त होऊ लागला. या कवितांमधून लोकशाहीचे विकेंद्रीकरण, सहकाराचे खरे–खोटे स्वरूप आणि त्याचा शेतकऱ्यांबरोबरच त्याच्याशी निगडित अन्य सर्व समाजातील सामान्य जनांवर होणारा परिणाम यांचे अत्यंत व्यापक आणि वास्तव चित्र पहावयास मिळू लागले. यात आनंद यादव, ना.धों. महानोर, विठ्ठल वाघ, उत्तम कोळगावकर, पुरुषोत्तम पाटील आणि या कालखंडातील अन्य अनेक कवींच्या कवितांचा वाटा फार मोठा आहे. येथूनच ग्रामीण साहित्याचा प्रवाह खऱ्या अर्थाने रूढ झालेला दिसतो.

विश्वास जहागिरदार, वासुदेव मुलाटे यासारख्या विचारवंतांनी ग्रामीण कवितेचे स्वरूप स्पष्ट केले आहे. आत्मभान आलेल्या ग्रामीण तरुण पिढीची कविता या काळात लिहिली गेली. ग्रामीण जीवनातील दैन्य, दारिद्र्य, शोषण या वास्तवाचा वेध ग्रामीण कवितेने घेतला आहे. म्हणजेच १९७५ नंतरच्या मराठी कवितेत समकालीन प्रश्नांचे प्रतिबिंब उमटते. या कवितांमधून शोषणाचा तीव्र निषेध केला आहे. ग्रामीण जीवनाचे अस्सल चित्रण, ग्रामीण संवेदनांची अभिव्यक्ती, ग्रामीण भागातील सुख–दुःख, भावभावना, श्रद्धा–अंधश्रद्धा इत्यादी गोष्टींचे चित्र ग्रामीण कवितेतून आलेले आहे. ग्रामीण काव्याच्या स्वरूपाविषयी डॉ. कैलास सार्वेकर म्हणतात, 'ज्या कवितेत ग्रामीण सजन जीवनाचे चित्रण ग्रामीण संवेदनशीलतेने केलेले असते तिला ग्रामीण कविता असे म्हटले जाते. या कवितेमध्ये खेडे गावाची संलग्न असलेले कृषी जीवन खेड्यातील जन जीवनाचे दुःख, हर्ष, दारिद्र्य, रूढी, परंपरा, संस्कृती या साऱ्यांचा समावेश होतो. सहाजिकच ग्रामीण भागातील निसर्ग, येथील वातावरण, अडी अडचणीत जीवन जगण्याच्या पद्धती, तेथील पारंपारिक मूल्य, ग्रामजीवनातील संघर्ष, दुष्काळ या गोष्टी ग्रामीण कवितेच्या माध्यमातून चित्रित होत आहेत.'[१]

**१९६० नंतरच्या ग्रामीण कविता ——**

ग्रामजीवन जगलेल्या, भोगलेल्या कवींच्या अनुभूतीने घेतलेले सहज शब्दरूप असे साठोत्तरी मराठी

ग्रामीण कवितेचे द्रव्यरूप आहे. आनंद यादव ('हिरवे जग' १९६०), राजा महाजन (डहाळी,१९६०), सरोजिनी बाबर( 'पाळणा' १९६४), सदाशिव माळी ('फुलमाळ' १९६७) यांचे कवितासंग्रह प्रसिद्ध झाले. ही कविता जानपद गीतांचे संस्कार वागविताना दिसते. मात्र ग्रामीण बोलीभाषेचा वापर करताना हे कवी संकोचताना दिसतात. या प्रवाहात पुढे पुरुषोत्तम पाटील, ना. धों. महानोर, विठ्ठल वाघ, शंकर बडे, राजा मुकुंद, एकनाथ देशमुख यांची कविता सामील झाली.

निसर्गप्रतिमांतून प्राणयानुभव व्यक्त करताना ना. धों. महानोर दिसतात. त्यांच्या 'रानातल्या कविता' (१९६७) यातून अस्सल ग्रामीण जीवनाचे दर्शन घडते. तसेच 'वही' या संग्रहातून लोकसाहित्यातील प्रादेशिक फॉर्म लक्षात येतो. शंकर बडे (इखा), विठ्ठल वाघ (साय), एकनाथ देशमुख (ओळखी— अनोळखी १९७२ ) यांच्या कवितेत आलेले जीवनानुभव हे ग्रामीणच आहे. विठ्ठल वाघांचे विदर्भीय बोलीभाषेतून ग्रामीण मानसिकता पकडण्याचे कौशल्य असामान्य आहे. तसेच मधुकर पांढरे, प्र.श्रा.चौधरी, राजा मुकुंद, गजमल माळी हे या कालखंडातले ग्रामीण जीवनानुभव अविष्कृत करणारे उल्लेखनीय आहेत.

**१९७५ नंतरच्या ग्रामीण कविता ——**

१९७५ पूर्व मराठी कवितेतील बहिणाबाई चौधरी, आनंद यादव, ना. धों. महानोर इत्यादी यांच्या कवितेतून ग्रामीण संवेदनशीलतेची विविध रूपे प्रकट झाली होती. ग्रामीण जीवन, ग्रामीण संस्कृती, ग्रामीण स्त्री, ग्रामीण जीवनातील प्रश्न, समस्या या जाणिवा या कवितांतून व्यक्त झाल्या. १९७५ नंतरच्या ग्रामीण कवितांचा आशय व अभिव्यक्ती यामध्ये आमूलाग्र बदल झाला. या सुमारास ग्रामीण साहित्याच्या प्रवाहाने चळवळीचे स्वरूप धारण केले. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनातील ही एक महत्त्वाची घटना होती. या चळवळीने ग्रामीण भागात राहणाऱ्या बहुजन समाजाच्या प्रश्नांशी, भावभावनांशी नाळ जोडण्याचा प्रयत्न केला. याच काळात दलित साहित्य, जनवादी साहित्य, आदिवासी साहित्यप्रवाह समृद्ध होऊ लागला. भाषा विषय यांचे कुठलेही दडपण न घेता ग्रामीण लेखक, कवी आपल्या अनुभव विश्वाला शब्दरूप देऊ लागला. स्वतंत्र ग्रामीण साहित्यसंमेलने, मेळावे, परिसंवाद होऊ लागले. ग्रामीण साहित्याप्रमाणे ग्रामीण कवितेने ही ग्रामजीवनातील वास्तवाचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

महाराष्ट्राच्या राज्यकारभाराची धुरा १९७५ नंतर ग्रामीण नेतृत्वाकडे राहिली. विविध योजनांच्या माध्यमातून झालेल्या हरितक्रांतीमुळे शेती व्यवसायाचे स्वरूप बदलले. शेतीचे व्यावसायिकरण झाल्याने ग्रामीण अर्थकारणाचे नवे पर्व सुरू झाले. या सर्व गुंतागुंतीच्या जीवनाची मांडणी ग्रामीण कवितेत होऊ लागली. उत्तम कोळगावकर, नारायण इंद्रजीत भालेराव, प्रकाश होळकर, गणेश देशमुख, श्रीकांत देशमुख, संतोष पवार, प्रदीप पाटील, जगदीश कदम, एकनाथ पाटील, लक्ष्मण महाडिक, सदाशिव नारायण जोशी, प्रवीण बांदेकर, प्रतिमा इंगोले, दासू वैद्य, प्रकाश किनगावकर, ऐश्वर्य पाटेकर इ.कवी ग्रामीण अनुभवविश्व मोठ्या सामर्थ्यानिशी अभिव्यक्त करीत आहेत. या बदलांचा शोध १९७५ नंतरची मराठी ग्रामीण कविता घेते.

आनंद यादव यांच्या 'मळ्याची माती' (१९७८) मध्ये एकीकडे अजूनही आपण आपल्या मळ्यातच अःहोत अशी 'सपनं पडत्यात' तर त्याच वेळी त्या मळ्यात गेल्यावर मात्र 'मी बघ्या पाव्हना' झालो आहे असा अनुभव कवीला येतो. आपसातील वैमनस्य, सावकारी पाश, दारिद्र्य आणि व्यसनाधीनता इत्यादींनी

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
Vidyawarta® Peer-Reviewed International Journal
Oct. To Dec., 2021 Special Issue


गाजलेला शेतकरी उत्तम कोळगावकर यांच्या 'जंगल झडी' (१९८२) मधील अनेक कवितातून दिसून येतो. राजन गवस ('हुंदका' १९८३), मोहन पाटील ('गाव आणि मातेच्या कविता') यांची ग्रामीण कविता याच काळात लिहिली गेली. अनुराधा पाटील यांची 'एखादी पारू... एखादी राही' ('तरीही' १९८५) ही कविता ग्रामीण स्त्रीची हालअपेष्टा अगतिकता आणि जीवनावरची निष्ठा चित्रित करते. वामन निंबाळकर यांची 'आई' ('गावकुसाबाहेरील कविता') ही कविता ग्रामीण दलित जीवनाचे कारुण्य चित्रित करते. इंद्रजित भालेराव ('पीकपाणी' १९८९) मधून मराठवाड्यचे ग्रामजीवन बोलीभाषेतून आविष्कृत होते.

**१९९० नंतरच्या ग्रामीण कविता ––**

इसवी सन १९९० नंतर जागतिकीकरणामुळे वांग्मयाबरोबरच इतर सर्वच सामाजिक क्षेत्रात मोठा प्रभाव पडला. याचा परिणाम म्हणून समाजव्यवस्था अंतर्बाह्य ढवळून निघाली. याचे प्रतिबिंब नव्वदोत्तर साहित्यात पडले. खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण यामुळे परिवर्तनाची एक लाट निर्माण झाली.

शेती व्यवस्थेचे दुबळेपण, खेड्यचे व ग्रामसंस्कृतीचे बकालपण, दारिद्र्य, भूक, उपासमार, स्त्री शोषण, कृषी संस्कृतीचा ऱ्हास, दहशत, फसवणूक, वस्तूकरण, मानवतेचे अवमुल्यन, मानवाच्या अस्तित्वाची निरर्थकता ही नव्वदोत्तरी ग्रामीण काव्याची प्रमुख आशयसूत्रे आहेत. १९९० नंतरचा ग्रामीण कवी नव्या अनुभवविश्व यामुळे अत्यंत अस्वस्थ, अंतर्मुख झाल्याने त्यांच्या काव्यात आत्मसूचक वाक्ये, उद्घोशणा, जाहिराती, दवंडी, लिलाव यांचा वापर मोठ्य प्रमाणात केलेला दिसतो. या कविता कल्पनेला अजिबात स्थान देत नाही. मात्र विचार, विश्लेषण, विद्रोह, आत्मभान, चीड यांना केंद्रस्थान मिळाले आहे. शेतकऱ्यांची मानसिकता, त्यांच्यातील विसंगतीवृत्ती, दुर्बलपणा, दुभंगलेपणा इ.जाण ही कविता करून देते. नारायण सुमंत, इंद्रजित भालेराव यांच्या काव्यातील शेतकऱ्यांची मुले बंडाला तयार आहेत. तर 'नारायण पासष्टी', 'भुईशास्त्र' या काव्यसंग्रहात अभंगरचनेचा वापर केल्याचे दिसते.

मुक्त अर्थव्यवस्थेमुळे शेतमालाचे झालेले अवमूल्यन यावर प्रखर टीका या कवितेत दिसते. जागतिकीकरणामुळे खेड्यंचा झालेला पोकळ विकास, शहरी संस्कृतीशी वाढलेले नाते यांचा परखड शब्दांत नव्वदोत्तरी ग्राम कविता समाचार घेते. इंद्रजीत भालेराव, लक्ष्मण महाडिक, शिवाजी सातपुते, एकनाथ पाटील, पी.विठ्ठल कल्पना दुधाळ, केशव देशमुख, महेश मोरे, श्रीकांत देशमुख, अजय कांडर, खेचू शिंदे, प्रदीप पाटील यांच्या कवितांमधून शेतीव्यवस्थेची सद्य:स्थिती व भवितव्याची वाटचाल अधोरेखित झाली आहे. नवीन प्रबळ कृषीजन व्यवस्था, कृषीजन संस्कृती निर्माण करण्याची भाषा ही कविता करते. आजच्या विस्कळीत जीवन व्यवस्थेचे शल्य प्रकट करून काही प्रश्नांचा उकल करण्याचा प्रयत्न ही कविता करते. ग्रामव्यवस्था बळकट करण्यासाठी, विकसित करण्यासाठी १९९० नंतरची कविता विचार करते.

उत्तम कोळगावकर यांच्या 'जंगलझडी' (१९८२) 'तळपाणी' (२०००) नारायण सुमंत यांच्या 'रानभरी' (१९८३) आणि 'सातबारा' (२००२) इंद्रजित भालेराव यांच्या 'आम्ही काबाडाचे धनी' (१९९२) 'दूर राहिलेला गाव' (१९९४), 'पेरा' (२००२), 'टाहो' ( २००४), 'भूमीचे मार्दव'( २०११), प्रकाश होळकर यांचे 'कोरडे नक्षत्र' (१९९७), श्रीकांत देशमुख यांचे 'बळीवंत' (१९९७) आणि 'आषाढमाती' (२००३),

प्रदीप पाटील यांचे 'आत्मसंवाद' (१९९६) आणि 'अंतरीचा भेद' (२००२), गणेश देशमुख यांच्या 'गावच्या कविता' (१९९६) संतोष पवार यांच्या 'भ्रमिष्टाचा जाहीरनामा' (२००३) आणि 'पिढीपेस्तर प्योदमात' (२००८) एकनाथ पाटील यांच्या 'सत्वशोधाच्या कविता' (२००४) लक्ष्मण महाडिक यांच्या 'कुणब्याची कविता' (२००३) कवितासंग्रहातून बदलत्या ग्रामीण जीवनाची व्यथा, शेतकरी जीवनाची शोकांतिका, कष्टकरी स्त्रिया यांच्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराची करूण कहाणी चित्रित केलेली आहे. प्रातिनिधिक स्वरूपात वरील काही ग्रामीण कवी व त्यांचे कवितासंग्रह येथे घेतले आहेत.

उपरोक्त कवींनी ग्रामीण कविता एका नव्या वळणावर नेऊन ठेवली. कवितेच्या रचनाबंधापासून ते भाषा, अर्थबंध, लयबंध यांचे स्वरूपच बदलून टाकले आहे. कारण ही सर्व कविता समकालीन वास्तवाची अनेक अंगाने चिकित्सा करणारी आहे. यातून १९९० नंतरच्या कवितेने आपले वेगळे व अढळ स्थान वांग्मयविश्वात प्रस्थापित केले आहे. कृषी व्यवस्थेचा आक्रोश टिपणारी, त्यांचे अश्रू पुसणारी, प्रसंगी त्यांना लढायला शिकविणारी आणि अन्यायाविरुद्ध दंड थोपटणारी ही नव्वदोत्तरी ग्रामीण कविता आहे.

**समारोप** —— आज जागतिकीकरणाच्या काळात शेतकऱ्याची अधिक वाताहत होत आहे. नवनवे कृषीसंशोधन खेड्यांपर्यंत येत आहे. लोकप्रतिनिधी शेतकऱ्यांचे लोकप्रतिनिधीत्व शासनात करीत आहेत. परंतु सततचा दुष्काळ आणि कर्जबाजारीपणा यामुळे हे संशोधन आणि प्रयोगही अर्ध्यावरच' आहेत. आज शहरीकरणाच्या प्रक्रियेत एक प्रकारचे दुभंगलेपण अनुभवणारा तरीही मनात गावाकडची माती जपू पाहणारा, बदलत्या वास्तवाला धीटपणे सामोरा जाणारा ग्रामीण कवी आपल्या अनुभवांशी प्रामाणिक राहून काव्यलेखन करीत आहे. वास्तवाकडे तो डोळसपणे पाहतो आहे. अनेक कवी ग्रामीण भागात राहून ग्रामीण जीवनाशी समरस होऊन काव्यलेखन करीत आहेत. काही प्रमाणात त्यांच्या अभिव्यक्तीच्या पद्धतीवर नागरी जीवनाचा पगडा पडलेला दिसतो. नोकरीसाठी शहरात राहणाऱ्या परंतु मनाने गावात असलेल्या शेतकरी कवीची तगमग अनेक कवितांमधून बघायला मिळते. दुर्दैवाने ग्रामीण संस्कृती ही आधुनिक संस्कृतीच्या प्रदूषणाने वेगाने दूषित होत चालली आहे अशी अनेक आव्हाने पेलून ग्रामीण कविता आपली निरागसता जपत आहे.

**संदर्भसूची** ——

१) मराठी ग्रामीण कवितेचा इतिहासः डॉ.कैलास सार्वेकर, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, 1999, पृ.०१

२) ग्रामीण वांग्मयाचा इतिहासः चंद्रकुमार नलगे, रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर

३) ग्रामीण साहित्य –प्रेरणा आणि प्रयोजनः श्रीराम गुंदेकर, दिलिपराज प्रकाशन, पुणे, 1999

४) आजची ग्रामीण कविताः डॉ.रणधीर शिंदे

□□□